3) The Board of Directors, in their meeting held on 4 August 2026, has approved a proposal for buy-back of up to 87,50,000 fully paid-up equity shares of face value ₹10 each, representing 5.00% of the total paid-up equity shares of the Company, subject to shareholders' approval. The buy-back is proposed to be undertaken through the tender offer route from eligible equity shareholders of the Company, other than the promoters, promoter group, and persons in control of the Company, at a price of ₹320 per equity share, for an aggregate consideration not exceeding ₹28,000 lakhs. The maximum buy-back size represents 24.51% of the aggregate of the Company's paid-up capital and free reserves as at 31 March 2026, based on the audited financial statements of the Company. The proposed buy-back shall be carried out in accordance with the applicable provisions of the Companies Act, 2013, the Securities and Exchange Board of India (Buy-Back of Securities) Regulations, 2018 (as amended), and other applicable laws and regulations.

For and on behalf of the Board of
VRL LOGISTICS LIMITED
VIJAY SANKESHWAR
Chairman and Managing Director
DIN: 00217714

Place: Hubballi
Date: August 4, 2026

Adfactors 229/26

परीक्षांमधील गैरप्रकारांचे खटले

सुनावणीसाठी आणखी २३ जलदगती न्यायालये

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : सार्वजनिक परीक्षांमधील प्रश्नपत्रिका फुटणे आणि परीक्षेतील गैरप्रकारांशी संबंधित खटल्यांसाठी राज्यात आणखी २३ विशेष जलदगती न्यायालये कार्यरत करण्याचे मुंबई उच्च न्यायालयाने नुकतेच स्पष्ट केले.

प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे यांनी १ ऑगस्ट रोजी याबाबतची अधिसूचना काढली. त्यानुसार, विविध जिल्ह्यांमध्ये न्यायिक अधिकाऱ्यांची नियुक्ती केली गेली आहे. हे अधिकारी २०२४ सालचा सार्वजनिक परीक्षा (अनुचित प्रकार प्रतिबंधक) कायदा, भारतीय न्याय संहिता (बीएनएस) मधील संबंधित तरतुदी आणि महाराष्ट्र विद्यापीठ, मंडळ व इतर विशिष्ट परीक्षांमधील गैरप्रकार प्रतिबंधक कायद्यांतर्गत खटले चालवतील.

या जिल्ह्यांमध्ये कार्यरत...

नव्या अधिसूचनेनुसार, बीड, चंद्रपूर, धुळे, गडचिरोली, गोंदिया, जळगाव, जालना, कोल्हापूर, नाशिक, उस्मानाबाद, परभणी, पुणे आणि सांगली या जिल्ह्यांमध्ये नव्याने घोषित केलेली ही विशेष जलदगती न्यायालये कार्यरत होणार आहेत. सातारा, सोलापूर, ठाणे, वर्धा, यवतमाळ, वाशिम आणि नंदुरबार येथेही अशीच न्यायालये अधिसूचित करण्यात आली आहेत.

मुंबईत, शहर दिवाणी आणि सत्र न्यायालय व मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय यामधून प्रत्येकी एका न्यायाधीशाची अशा खटल्यांच्या सुनावणीसाठी विशेषतः नियुक्ती केली आहे.

ॲनालॉग पनीरवर वर्षभरासाठी बंदी

ग्राहकांची दिशाभूल रोखण्यासाठी तुकाराम मुंढे यांचे आदेश

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

मुंबई : राज्यात पनीरच्या नावाखाली विकल्या जाणाऱ्या ॲनालॉग किंवा दुग्धेतर पनीरच्या उत्पादन, साठवणूक, वाहतूक, वितरण आणि विक्रीवर राज्य सरकारने एक वर्षासाठी बंदी घातली आहे.

अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी यासंदर्भातील आदेश जारी केला. राज्यभरातील तपासणीत पनीरचे ३५.४ टक्के नमुने विहित मानकांशी विसंगत आढळल्याने आणि अनेक नमुन्यांमध्ये दुधातील स्निग्धांशाऐवजी वनस्पतीजन्य स्निग्धांशाचा वापर झाल्याचे स्पष्ट झाल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे. भाजपचे श्रीगोंदाचे आमदार विक्रम पाचपुते यांनी विधिमंडळात प्रश्न उपस्थित करून पाठपुरावा केला होता. तसेच याबाबत मंत्री नरहरी झिरवाळ यांनाही पत्र लिहिले होते. या बंदीचे स्वागत करत, आदेशाची काटेकोर अंमलबजावणी व्हावी, अशी अपेक्षा पाचपुते यांनी 'लोकसत्ता'शी बोलताना व्यक्त केली.

ॲनालॉग पनीर म्हणजे काय?

दुधातील फॅट्स किंवा घटक काढून त्याऐवजी वनस्पतीजन्य तेल, डालडा किंवा इतर दुधाव्यतिरिक्तच्या वस्तू वापरून बनवलेल्या पदार्थाला ॲनालॉग किंवा दुग्धेतर पनीर म्हटले जाईल.

१०९ नमुने निकृष्ट

१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राज्यभरातून गोळा केलेल्या ३०८ नमुन्यांच्या तपासणीत १०९ नमुने निकृष्ट किंवा असुरक्षित असल्याचे आढळले. त्यापैकी ७९ नमुने निकृष्ट दर्जाचे तर ३० नमुने थेट असुरक्षित असल्याचा प्रयोगशाळेचा अहवाल आहे. तपासणीत अनेक नमुन्यांमध्ये दुधातील स्निग्धांशाऐवजी वनस्पतीजन्य स्निग्धांश वापरण्यात आल्याचेही निष्पन्न झाले.

शिक्षणक्षेत्रातील गैरप्रकाराविरोधात पुण्यात मोर्चा

मुंबई : शिक्षणक्षेत्रात गैरप्रकार सुरू असून अपात्र आणि परराज्यात काळ्या यादीत टाकलेल्या कंपन्यांना परीक्षा घेण्याचे ठेके दिले जात आहेत. सीईटी परीक्षेत पर्सेंटाईल काढण्याचे सूत्र संशयास्पद आहे. त्यामुळे पर्सेंटाईल काढण्याचे सूत्र जाहीर करावे. आमच्या मागण्या मान्य न झाल्यास पुण्यात सर्वपक्षीय, सर्व विद्यार्थी संघटनांना घेऊन मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा आमदार रोहित पवार यांनी दिला आहे.

सीईटी परीक्षा घेण्यासाठी तीनदा निविदा प्रक्रिया राबवली गेली. तीनही वेळेस टीसीएसची बोली सर्वात कमी होती. तरीही एज्यु पार्क कंपनीला काम दिले. एज्यु पार्कने स्वतः काम न करता मेरीट ट्रॅक कंपनीला काम सोपवले. जम्मू-काश्मीर सरकारने मेरीट ट्रॅकला काळ्या यादीत टाकले आहे. एज्यु पार्क कंपनी बिहारमध्ये काळ्या यादीत आहे, असेही रोहित पवार यांनी म्हटले आहे.

कल्याण-डोंबिवलीत स्वाइन फ्लूचे दोन रुग्ण

लोकसत्ता खास प्रतिनिधी

कल्याण : कल्याण-डोंबिवली पालिका हद्दीत स्वाइन फ्लूचे दोन रुग्ण आढळून आले आहेत. दोघांवर खासगी रुग्णालयात उपचार करण्यात आले असून त्यांची प्रकृती स्थिर आहे. उपचारानंतर त्यांना घरी सोडण्यात आले, अशी माहिती कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या कार्यावाहक वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपा शुक्ल यांनी दिली.

स्वाइन फ्लू हा संसर्गजन्य आजार आहे. या आजारामध्ये तीव्र ताप, खोकला, सर्दी, घसा दुखणे, अंगदुखी, अशक्तपणा अशी लक्षणे दिसून येतात. यापैकी कोणतीही लक्षणे आढळल्यास रुक्मिणीबाई रुग्णालय, डोंबिवलीतील शास्त्रीनगर रुग्णालय तसेच ३५ नागरी आरोग्य केंद्रे आणि आरोग्यवर्धिनी केंद्रांत तपासणी व उपचार करून घ्यावेत, असे आवाहन डॉ. शुक्ल यांनी केले.

पावसाळ्यात संसर्गजन्य आजार वाढत असल्याने आरोग्य विभागाकडून उघड्यावरील खाद्यपदार्थांच्या गाड्या बंद केल्या जातात. परंतु, यावर्षी हातगाडीचालकांना फक्त नोटिसा बजावल्या, मात्र कारवाई न केल्याने उघड्यावर खाद्यपदार्थांची विक्री सुरू आहे.

पथविक्रेते समित्यांची अद्याप स्थापना का नाही?

उच्च न्यायालयाचे राज्य सरकारला विलंबावरून खडेबोल

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : वर्षाच्या सुरुवातीला आदेश देऊनही राज्यभरातील पथविक्रेत्यांसाठी तक्रार निवारण समित्या अद्याप स्थापन करण्यात का आल्या नाहीत, असा प्रश्न करून मुंबई उच्च न्यायालयाने त्यावरून राज्य सरकारला फटकारले.

नगरविकास विभागाने २८ एप्रिल २०२४ मध्ये शासन निर्णयाद्वारे सर्व महापालिका आणि जिल्हाधिकाऱ्यांना तीन महिन्यांत पथविक्रेत्यांसाठी तक्रार निवारण समित्या स्थापन करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश दिले होते. ही मुदत ३१ जुलै रोजी संपुष्टात आली. तरीही राज्यभरात फक्त नऊ समित्यांची स्थापना केल्याचे निरीक्षण न्या. भारती डांगरे आणि न्या. मंजुषा देशपांडे यांच्या खंडपीठाने नोंदवले.

न्यायालयात सादर केलेल्या तक्त्यानुसार, केवळ धुळे महानगरपालिका आणि आठ नगरपालिकांनी या समित्या स्थापन केल्या असून नगरविकास विभागाने दिलेल्या आदेशांना सरकारी अधिकाऱ्यांनी किती गांभीर्याने घेतले हे या आकडेवारीवरून दिसत असल्याचे ताशेरेही न्यायालयाने सरकारवर ओढले.

म्हाडाच्या २,६४० घरांसाठी उद्या सोडत

मुंबई : म्हाडाच्या मुंबई मंडळाच्या २,६४० घरांच्या सोडतीच्या निकालाची सुमारे ७५ हजार अर्जदारांना मागील कित्येक दिवसांपासून प्रतीक्षा होती. अखेर मुंबई मंडळाला सोडतीसाठी मुहूर्त मिळाला असून गुरुवारी, ६ ऑगस्ट रोजी वांद्रे येथील रंगशारदा सभागृहात दुपारी १२ वाजता सोडत काढली जाणार आहे.

बोरिवली, गोरेगाव, जुहू, वांद्रे, दादर, ताडदेव, विक्रोळी आणि अन्य ठिकाणच्या २६४० घरांसाठी मंडळाने ३० मार्चपासून नोंदणी, अर्जविक्री-स्वीकृती प्रक्रिया सुरू केली होती.

तांत्रिक बिघाडामुळे सात वातानुकूलित लोकल रद्द

मुंबई : मध्य रेल्वेवरील वातानुकूलित (एसी) लोकलच्या तांत्रिक बिघाडाच्या घटना सातत्याने समोर येत असून, त्याचा फटका प्रवाशांना बसत आहे. एका वातानुकूलित लोकलमध्ये मंगळवारी तांत्रिक बिघाड झाल्याने नियोजित सात वातानुकूलित लोकल सेवा सामान्य लोकल रेकद्वारे चालविण्यात आल्या, त्यामुळे वातानुकूलित लोकलने प्रवास करणाऱ्यांची गैरसोय झाली.

मध्य रेल्वेच्या माहितीनुसार, नियमित देखभाल कामादरम्यान एका वातानुकूलित रेकमध्ये तांत्रिक अडचण निर्माण झाली. त्यामुळे संबंधित फेऱ्यांसाठी वातानुकूलित रेकऐवजी सामान्य लोकल रेक उपलब्ध करून देण्यात आला. बदललेली पहिली सेवा दुपारी ४.३४ ची कुर्ला-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) धीमी लोकल होती.

भारतीय डाक विभाग

पोस्टल लाइफ इन्शुरन्स योजनेअंतर्गत थेट एजंट नेमणे आहे

माननीय वरिष्ठ अधीक्षक डाकघर, ठाणे विभाग यांच्या कार्यक्षेत्रात टपाल जीवन विमा व ग्रामीण टपाल जीवन विमा या योजनांचा प्रचार, प्रसार व विक्रीसाठी थेट प्रतिनिधींची (एजंट) नेमणूक मुलाखतीद्वारे केली जाणार आहे. याकरिता पात्रता व अन्य निकष खालीलप्रमाणे आहेत :

वयोमर्यादा : उमेदवाराचे किमान वय १८ ते कमाल ५० वर्षे असावे.

शैक्षणिक पात्रता : उमेदवार हा राज्य अथवा केंद्र शासनाच्या मान्यताप्राप्त बोर्डाद्वारे किमान दहावी अथवा समतुल्य इयत्ता पास असावा.

श्रेणी : बेरोजगार/स्वयंरोजगारीत तरुण-तरुणी, कोणत्याही कंपनीचे माजी विमा एजंट, माजी जीवन विमा सल्लागार, अंगणवाडी कर्मचारी, महिला मंडळ कर्मचारी, माजी सैनिक, निवृत्त शिक्षक, स्वयं सहाय्यता गट सदस्य (Self Help Group Workers), स्वयंसेवी संघटना पदाधिकारी ग्रामपंचायत सदस्य किंवा वरिष्ठ अधीक्षक डाकघर यांना मान्य असलेले सुयोग्य व्यक्ती अर्ज करू शकतात.

इच्छुक उमेदवारास विमा पॉलिसी विक्रीचा अनुभव, संगणकाचे ज्ञान, स्थानिक भागाची पूर्णतः माहिती असणे अपेक्षित आहे. थेट मुलाखतीद्वारे निवड झालेल्या थेट एजंटला टपाल विभागाने वेळोवेळी ठरवून दिल्याप्रमाणे कमिशन/प्रोत्साहन भत्ता दिला जाईल.

निवड झालेल्या उमेदवारांनी कायम परवाना परीक्षा फी रुपये ४०२/- तसेच रुपये ५०००/- (सुरक्षा अनामत) मूल्याचे व भारताचे राष्ट्रपतींच्या नावे तारण ठेवलेले राष्ट्रीय बचत पत्र अथवा किसान विकास पत्र वरिष्ठ अधीक्षक डाकघर, ठाणे यांच्याकडे सादर करावे लागेल.

इच्छुक उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या ठिकाणी थेट मुलाखतीस लेखी अर्ज व शैक्षणिक प्रमाणपत्रांच्या मूळ व छायांकित प्रती, आधार कार्ड, पॅन कार्ड, जन्मतारखेचा दाखला, फोटो व अन्य संबंधित दस्तावेजासह उपस्थित रहावे :

मुलाखतीचे ठिकाण	मुलाखतीचा दिनांक	वेळ
वरिष्ठ अधीक्षक डाकघर ठाणे मंडल यांचे कार्यालय, दुसरा मजला, ठाणे (प.) रेल्वे स्टेशनजवळ, ठाणे-४००६०१.	१८.०८.२०२६	सकाळी ठीक १०.३० पासून ते दुपारी १३.०० वाजेपर्यंत.

अधिक माहितीसाठी संपर्क :- श्री. सीताराम रेडकर - ८६९२०१४१७५

सही/-
वरिष्ठ अधीक्षक डाकघर,
ठाणे विभाग, ठाणे-४००६०१.

उप वनसंरक्षक
जव्हार वनविभाग जव्हार यांचे कार्यालय
राजीव गांधी स्टेडियमजवळ, जव्हार, जि. पालघर -४०१६०३
दूरध्वनी क्रमांक ०२५२०-२२२२५२
ई-मेल : dycfjawhar@mahaforest.gov.in, dycfjawhar@gmail.com

जाहीर सूचना

सर्व नागरिकांना सूचित करण्यात येते की, अलीकडे महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) अधिनियम, १९७५ चे कलम ३५ अन्वये बाधित संपादित/खाजगी वन जमिनींबाबत विविध प्रकारच्या अफवा व दिशाभूल करणारी माहिती प्रसारित होत आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या नाहर (५४५४/२०१९ व इतर अन्य ९५) प्रकरणांतील निर्णयानंतर अशा जमिनी संबंधित खातेदारांच्या नावावर करण्यात येत असून त्यांची खरेदी-विक्री कायदेशीर असल्याचा गैरसमज निर्माण केला जात आहे. तथापि, सदर निर्णय खाजगी मालकीचे वनांपूरता असून कलम ३५ अन्वये बाधित संपादित वनांना सदर निर्णय लागू नाही. त्यासाठी केंद्र शासनाच्या परवानगीशिवाय हस्तांतरण होऊ शकत नाही. खाजगी वनांबाबत देखील सदर खाजगी वन जमिनी संबंधित खातेदारांच्या नावावर हस्तांतरित करण्याबाबत शासनाकडून मार्गदर्शक सूचना प्राप्त होण्याची प्रक्रीया सुरु आहे. तसेच, मा. उच्च न्यायालयात अशोक शर्मा (११६४/२०२३) प्रकरणात (उदा. वन नोंदी) दिनांक ०३.०२.२०२५ चे आदेशान्वये कोणत्याही वन / वनसंज्ञा जमिनींच्या हस्तांतरणासंदर्भातील कार्यवाहीस स्थगिती देण्यात आलेली आहे. शिवाय मा. सर्वोच्च न्यायालय प्रकरण CA ७०१७/२००९ मधील आदेशानुसार केवळ ७/१२ वरील नोंदी मालकीचे अंतिम दस्तऐवज असून इतर शासकीय दस्तऐवज देखील ग्राह्य धरणे क्रमप्राप्त आहे. या पार्श्वभूमीवर व्यक्ती किंवा संस्था नागरिकांना कमी किमतीत अशा जमिनी विक्रीस उपलब्ध असल्याचे सांगून किंवा भविष्यात त्या नियमितपणे हस्तांतरित होतील, अशा प्रकारची दिशाभूल करणारी माहिती देऊन आर्थिक व्यवहार करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे निदर्शनास येत आहे. अशा प्रकारच्या दाव्यांची सत्यता संबंधित सक्षम शासकीय अभिलेख व कायदेशीर प्रक्रियेअभावी ग्राह्य धरता येत नाही. त्यामुळे अशा जमिनींची खरेदी- विक्री अथवा इतर आर्थिक व्यवहार करण्यापूर्वी संबंधित महसूल व वन विभागाच्या अभिलेखांची पडताळणी करावी. कोणताही व्यवहार करण्यापूर्वी संबंधित सक्षम शासकीय कार्यालयाकडून आवश्यक माहिती व कायदेशीर स्थितीची खात्री करूनच पुढील कार्यवाही करावी. अन्यथा भविष्यात आर्थिक व कायदेशीर नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सर्व नागरिकांनी सावधगिरी बाळगून अशा व्यवहारांना बळी पडू नये, असे आवाहन वनविभागामार्फत करण्यात येत आहे.

सही/-
उप वनसंरक्षक
जव्हार वनविभाग, जव्हार.

LIC HFL
LIC HOUSING FINANCE LTD

एलआयसी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

सीआयएन: एल६५९२२एमएच१९८९पीएलसी०५२२५७
नोंदणीकृत आणि कॉर्पोरेट कार्यालय: १३१ मेकर टॉवर्स, ''एफ'' प्रिमायसेस, १३ वा मजला, कफ परेड, मुंबई-४०० ००५.
दूरध्वनी: +९१ २२ २२१७८६००, **फॅक्स:** +९१ २२ २२१७८७७७
ई-मेल: lichousing@lichousing.com. **संकेतस्थळ:** www.lichousing.com

सदतीसाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आणि दूरस्थ ई-मतदानाबाबत माहिती

याद्वारे सूचना देण्यात येते की, एलआयसी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (''कंपनी'') ची सदतीसावी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) **शुक्रवार, २८ ऑगस्ट, २०२६ रोजी दु. ३.३० वाज.** व्हिडिओ कॉन्फरन्स ('व्हीसी') / इतर दृकश्राव्य माध्यमांद्वारे ('ओएव्हीएम') आयोजित करण्यात येणार आहे. जे कंपनी अधिनियम, २०१३ मधील लागू तरतुदी तसेच कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने (एमसीए) ५ मे, २०२० रोजी जारी केलेल्या सामान्य परिपत्रक क्र. २०/२०२० सह वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या त्यानंतरच्या परिपत्रकांच्या सहवाचनाने, त्यापैकी सर्वात अलीकडील २२ सप्टेंबर, २०२५ चे सामान्य परिपत्रक क्र. ०३/२०२५ (एमसीए परिपत्रके), तसेच १३ मे २०२० चे सेबी परिपत्रक क्र. सेबी/एचओ/सीएफडी/सीएमडी२/सीआयआर/पी/२०२२/६२ आणि सेबी (सूचिबद्धतेच्या बंधने व प्रकटीकरण आवश्यकता) विनियम, २०१५ (''सेबी सूचिबद्धता विनियम'') यांच्या अनुषंगाने आयोजित करण्यात येत आहे. कंपनी अधिनियम, २०१३ (अधिनियम), सेबी (सूचिबद्धतेच्या बंधने व प्रकटीकरण आवश्यकता) विनियम, २०१५ (सूचिबद्धता विनियम) आणि एमसीए परिपत्रके यांच्या तरतुदींचे पालन करून कंपनीची ३७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा व्हीसी/ओएव्हीएमद्वारे आयोजित करण्यात येईल. वार्षिक सर्वसाधारण सभेचे कामकाज कंपनीचे नोंदणीकृत आणि कॉर्पोरेट कार्यालय, १३१ मेकर टॉवर्स, ''एफ'' प्रिमायसेस, १३ वा मजला, कफ परेड, मुंबई-४०० ००५, महाराष्ट्र येथे पार पडल्याचे मानले जाईल.

कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम १०१ मधील तरतुदी आणि त्याअंतर्गत तयार करण्यात आलेल्या नियमांनुसार, एजीएम बोलाविण्याची सूचना तसेच आर्थिक वर्ष २०२५-२०२६ चा वार्षिक अहवाल यांच्या इलेक्ट्रॉनिक प्रती कंपनीचे निबंधक आणि हस्तांतरण प्रतिनिधी अर्थात एमयूएफजी इंटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वी लिंक इंटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड) / डिपॉझिटरी सहभागी यांच्याकडे ज्यांचे ई-मेल आयडी नोंदणीकृत आहेत अशा कंपनीच्या सर्व सभासदांना ई-मेलद्वारे पाठविण्यात आल्या आहेत.

ज्या सर्व सभासदांनी त्यांचे ई-मेल आयडी कंपनीकडे किंवा निबंधक आणि हस्तांतरण एजंटकडे किंवा डिपॉझिटरीज किंवा डिपॉझिटरी सहभागींकडे नोंदणीकृत केले आहेत आणि ज्यांची नावे शुक्रवार, ३१ जुलै, २०२६ रोजीच्या लाभधारक स्थिती यादीमध्ये समाविष्ट आहेत, अशा सर्व सभासदांना वार्षिक अहवाल ई-मेलद्वारे पाठविण्यात आले आहेत. सदर दस्तऐवज कंपनीच्या संकेतस्थळ www.lichousing.com तसेच एमयूएफजी इनटाइम इंडिया प्रा. लि. च्या संकेतस्थळ https://instavote.linkintime.co.in/ वर अपलोड करण्यात आले आहेत. तथापि, एखाद्या सभासदास सदर दस्तऐवजांची प्रत्यक्ष प्रत प्राप्त करण्याची इच्छा असल्यास, त्याने/तिने, लागू असेल त्यानुसार, त्यांचा/तिचा डीपीआयडी आणि क्लायंट आयडी किंवा फोलिओ क्र. यांचा योग्य उल्लेख करून, co.secretarial@lichousing.com या ई-मेल पत्त्यावर ई-मेल पाठवावा किंवा पत्र पाठवावे, जेणेकरून कंपनीचा निबंधक आणि हस्तांतरण एजंट त्याच्या/तिच्या विनंतीचे पालन करू शकेल.

कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम १०८ मधील तरतुदी, कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) सुधारणा नियम, २०१५ मधील नियम २०, सेबी (सूचिबद्धतेच्या बंधने व प्रकटीकरण आवश्यकता) विनियम, २०१५ मधील विनियम ४४ आणि इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया यांनी जारी केलेल्या सर्वसाधारण सभांसाठीच्या सचिवीय मानक (एसएस-II) यांच्या अनुषंगाने, कंपनीला आपल्या भागधारकांना ''दूरस्थ ई-मतदान'' (म्हणजेच एजीएमच्या स्थळाव्यतिरिक्त अन्य ठिकाणाहून ई-मतदान) सुविधा इन्स्टावोट - एमयूएफजी इंटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांनी उपलब्ध करून दिलेल्या ई-मतदान सेवांद्वारे प्रदान करताना आनंद होत आहे, जेणेकरून ते सदर सूचनेमध्ये नमूद केलेल्या सर्व ठरावांवर इलेक्ट्रॉनिक माध्यमातून आपले मतदान करू शकतील.

कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) सुधारणा नियम, २०१५ मधील नियम २० नुसार, कंपनीने शुक्रवार, २१ ऑगस्ट, २०२६ हा दिवस ''कट-ऑफ दिनांक'' म्हणून निश्चित केला आहे, ज्याच्या आधारे सभासदांची इलेक्ट्रॉनिक माध्यमातून मतदान करण्याची किंवा एजीएममध्ये मतदान करण्याची पात्रता निश्चित करण्यात येईल.

कट-ऑफ दिनांक अर्थात शुक्रवार, २१ ऑगस्ट, २०२६ रोजी कंपनीच्या सभासद नोंदवहीत किंवा डिपॉझिटरीजद्वारे राखण्यात आलेल्या लाभधारक मालकांच्या विवरणपत्रात ज्यांचे नाव नोंदलेले असेल, अशाच व्यक्तीस दूरस्थ ई-मतदानाची सुविधा घेण्याचा किंवा एजीएममध्ये मतदान करण्याचा अधिकार असेल.

कंपनी अधिनियम, २०१३ आणि त्याअंतर्गत नियमांमधील तरतुदींनुसार तपशील खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत:

- आर्थिक वर्ष २०२५-२०२६ साठी सूचना आणि वार्षिक अहवाल ई-मेलद्वारे पाठविणे पूर्ण झाल्याचा दिनांक: ०४ ऑगस्ट, २०२६.
- इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे दूरस्थ ई-मतदान सुरू होण्याचा दिनांक व वेळ: मंगळवार, २५ ऑगस्ट, २०२६ रोजी स. ०९.०० वाज. (भाप्रवे).
- इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे दूरस्थ ई-मतदान समाप्त होण्याचा दिनांक व वेळ: गुरुवार, २७ ऑगस्ट, २०२६ रोजी सायं. ५.०० वाज. (भाप्रवे). त्यानंतर एमयूएफजी इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेडद्वारे दूरस्थ ई-मतदान प्रणाली निष्क्रिय करण्यात येईल.
- ज्या सभासदांनी सभेपूर्वी दूरस्थ ई-मतदानाद्वारे आपले मतदान केले आहे, ते सभेला उपस्थित राहू शकतात; परंतु त्यांना पुन्हा मतदान करण्याचा अधिकार राहणार नाही. तसेच जे सभासद ई-मतदानाद्वारे मतदान करू शकलेले नाहीत, त्यांना इन्स्टामीटद्वारे वार्षिक सर्वसाधारण सभेदरम्यान मतदान करता येईल.
- मे. बीपीपी अँड कंपनी, कंपनी सचिव, पुणे (सभासदत्व क्र.: एसीएस ४७३१२ आणि व्यवसाय प्रमाणपत्र क्र.: १९९०२ तसेच फर्म नोंदणी क्र.: एस२०१८एमएच५६५२००) यांची कंपनीने ई-मतदान प्रक्रियेची निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने छाननी करण्यासाठी छाननीकार म्हणून नियुक्ती केली आहे.
- जाहीर करण्यात आलेले निकाल तत्काळ शेअर बाजारांना (एनएसई आणि बीएसई), एमयूएफजी इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांना कळविण्यात येतील आणि कंपनीच्या www.lichousing.com या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येतील.
- कंपनीकडून एजीएमची सूचना पाठविल्यानंतर ज्यांनी कंपनीचे समभाग संपादित केले आहेत आणि जे कंपनीचे सभासद झाले आहेत तसेच ज्यांची नावे कट-ऑफ दिनांक अर्थात शुक्रवार, २१ ऑगस्ट, २०२६ रोजी कंपनीच्या सभासद नोंदवहीत किंवा डिपॉझिटरीजद्वारे राखण्यात आलेल्या लाभधारक मालकीच्या विवरणपत्रात समाविष्ट आहेत, अशा व्यक्तींना कंपनीच्या www.lichousing.com या संकेतस्थळावर तसेच एमयूएफजी इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेडच्या https://in.mpms.mufg.com/ या संकेतस्थळावर एजीएम बोलाविण्याची सूचना पाहता येईल. अशा सभासदांना एजीएमच्या सूचनेतील ई-मतदानाच्या सूचनांमध्ये नमूद केलेल्या प्रक्रियेचे पालन करून दूरस्थ ई-मतदानाद्वारे आपला मतदानाचा अधिकार बजावता येईल.
- दूरस्थ ई-मतदानासंबंधी कोणतीही चौकशी / तक्रार असल्यास, सहाय्यक उपाध्यक्ष - ई-मतदान, एमयूएफजी इनटाइम इंडिया प्रा. लि., सी-१०१, एम्बसी २४७, एल.बी.एस. मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई-४०० ०८३ यांच्याशी संपर्क साधावा. ई-मेल: enotices@in.mpms.mufg.com. अथवा सभासदांनी https://instavote.linkintime.co.in/ या संकेतस्थळावरील हेल्प विभागात उपलब्ध असलेले वारंवार विचारले जाणारे प्रश्न (एफएक्यू) आणि 'ई-मतदान मार्गदर्शिका' यांचा संदर्भ घ्यावा.

एजीएमची सूचना, ज्यामध्ये इतर बाबींसह ई-मतदान प्रक्रियेची कार्यपद्धती आणि रीती नमूद केलेली आहे, तसेच वार्षिक अहवाल आणि लेखापरीक्षित वित्तीय विवरणपत्रे कंपनीच्या www.lichousing.com या संकेतस्थळावरही उपलब्ध आहेत.

व्हीसी/ओएव्हीएमद्वारे एजीएममध्ये सहभागी होण्यासाठीच्या सविस्तर सूचना एजीएमच्या सूचनेमध्ये देण्यात आल्या आहेत. सभासदांनी त्या काळजीपूर्वक वाचाव्यात. एजीएमपूर्वी किंवा सभेदरम्यान ज्यांना सहाय्याची आवश्यकता असेल, अशा सभासदांनी खालील ई-मेल आयडीवर विनंती पाठवावी:

उद्देश / कार्य	ई-मेल आयडी
ई-मतदान	enotices@in.mpms.mufg.com instameet@in.mpms.mufg.com
ई-मेल आयडी आणि बँक खाते तपशीलांची नोंदणी / अधिकृत प्रतिनिधी नामनिर्देशित करू इच्छिणारे कॉर्पोरेट सभासद / वक्ता म्हणून नोंदणी / कागदपत्रांची पाहणी	enotices@in.mpms.mufg.com
कंपनीचे समभाग संपादन करून ही सूचना पाठविल्यानंतर कंपनीचे सभासद बनलेली कोणतीही व्यक्ती आणि जिला सभेत मतदान करावयाचे आहे	insta.vote@linkintime.co.in

संचालक मंडळाच्या आदेशानुसार
एलआयसी हाऊसिंग फायनान्स लिमिटेडकरिता
सही/-
वर्षा हारदासानी
कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी

ठिकाण : मुंबई
दिनांक: ०४ ऑगस्ट, २०२६

L&T Technology Services

एल अँड टी टेक्नॉलॉजी सर्व्हिसेस लिमिटेड

(लार्सन अँड टुब्रो लिमिटेडची उपकंपनी)
सीआयएन : L72900MH2012PLC232169
नोंदणीकृत कार्यालय: एल अँड टी हाउस, एन. एम. मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई-४०० ००१. **दूरध्वनी:** (९१२२) ६७९२ ५२५७; **फॅक्स:** (९१२२) ६७५२ ५८५८
ई-मेल: investor@ltts.com; **वेबसाईट:** www.ltts.com

पोस्टल मतदानाची सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, कंपनी कायदा, २०१३ (**'कायदा'**) मधील कलम ११० (कलम १०८ आणि इतर लागू तरतुदींसह वाचले असता), कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ (**'नियम'**) मधील नियम २० आणि २२ (ज्यामध्ये वेळोवेळी सुधारणा केल्यानुसार सध्या अंमलात असलेल्या कोणत्याही वैधानिक सुधारणा किंवा पुर्न-अधिनियमांचा समावेश आहे), कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय (**'एमसीए'**) द्वारे जारी केलेले सामान्य परिपत्रक क्र. ३/२०२५ दिनांक २२ सप्टेंबर २०२५ (या संदर्भात यापूर्वी जारी केलेल्या परिपत्रकांच्या अनुषंगाने) (**'एमसीए परिपत्रके'**), सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ (**'लिस्टिंग नियम'**) मधील नियमन ४४, आणि 'द इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया' द्वारे जारी केलेले 'जनरल मीटिंग' (सर्वसाधारण सभा) बाबतचे सेक्रेटरियल स्टँडर्ड-२ (**'एसएस-२'**) यांच्या तरतुदींनुसार तसेच इतर लागू कायदे, नियम आणि तरतुदींनुसार (ज्यामध्ये त्यातील कोणत्याही वैधानिक सुधारणा किंवा पुनर्रचनेचा समावेश असेल, जे त्या वेळी अंमलात असतील), कंपनीचे स्वतंत्र संचालक म्हणून श्री. लुईस मिरांडा (DIN: ०१०५५४९३) यांची विशेष ठरावाद्वारे पुनर्नियुक्ती करण्यासाठी, कंपनीच्या सदस्यांची (**'सदस्य' किंवा 'इक्विटी भागधारक'**) मंजुरी 'पोस्टल बॅलट'द्वारे (ज्यामध्ये 'रिमोट ई-व्होटिंग' किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे मतदान समाविष्ट आहे) मागवण्यात येत आहे.

कंपनीने मंगळवार, ४ ऑगस्ट २०२६ रोजी, ज्या सदस्यांचे ई-मेल पत्ते कंपनीकडे किंवा कंपनीचे रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट (म्हणजेच केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड - 'केफिनटेक'') / डिपॉझिटरीज / डिपॉझिटरी पार्टिसिपंट्सकडे नोंदणीकृत आहेत, त्यांना इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे (ई-मेलद्वारे) 'पोस्टल बॅलट'ची सूचना पाठवण्याची प्रक्रिया पूर्ण केली आहे. ही सूचना अशा सदस्यांना पाठवण्यात आली आहे ज्यांची नावे 'सदस्यांच्या नोंदवही'मध्ये किंवा 'बेनिफिशियल ओनर्स'च्या (लाभार्थी मालकांच्या) यादीत समाविष्ट आहेत; ही माहिती 'कट-ऑफ तारीख' असलेल्या शुक्रवार, ३१ जुलै २०२६ रोजी डिपॉझिटरीजकडून प्राप्त झाली होती. कृपया नोंद घ्यावी की, या 'पोस्टल बॅलट'साठी सदस्यांना सूचनेची छापील प्रत, 'पोस्टल बॅलट' फॉर्म आणि 'प्री-पेड बिझनेस रिप्लाय लिफाफा' पाठवण्यात आलेला नाही. ज्या व्यक्ती 'कट-ऑफ तारखे'ला सदस्य नाहीत, त्यांनी या सूचनेकडे केवळ माहितीचा स्रोत म्हणून पहावे.

पोस्टल बॅलेटची सूचना कंपनीच्या www.ltts.com या संकेतस्थळावर, तसेच स्टॉक एक्स्चेंजच्या (म्हणजेच बीएसई लिमिटेड ('बीएसई') च्या www.bseindia.com आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया (एनएसई) च्या www.nseindia.com या) संकेतस्थळांवर आणि नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड ('एनएसडीएल') च्या www.evoting.nsdl.com या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे.

इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान

कंपनीने आपल्या सर्व सदस्यांना मतदान करण्यासाठी 'रिमोट ई-व्होटिंग' (दूरस्थ इलेक्ट्रॉनिक मतदान) सुविधा उपलब्ध करून देण्याकरिता 'नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड' (**एनएसडीएल**) या अधिकृत संस्थेची सेवा घेतली आहे. रिमोट ई-व्होटिंगसाठीची सविस्तर कार्यपद्धती आणि सूचना 'पोस्टल बॅलट'च्या (टपालाद्वारे मतदानासाठीच्या) सूचनेत दिल्या आहेत. कायद्यातील तरतुदी आणि 'लिस्टिंग रेग्युलेशन्स'चे (सूचीकरण नियमावलीचे) पालन करून, कंपनीने आपल्या सदस्यांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करता यावे यासाठी केवळ 'रिमोट ई-व्होटिंग'ची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. सदस्यांनी कृपया नोंद घ्यावी की, केवळ अशाच व्यक्तींना सूचनेत नमूद केलेल्या ठरावावर मतदान करण्याचा अधिकार असेल, ज्यांची नावे 'कट-ऑफ तारीख' म्हणजेच शुक्रवार, ३१ जुलै २०२६ रोजी 'सदस्य नोंदवही'मध्ये किंवा एनएसडीएल आणि 'सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड' (**सीडीएसएल**) यांनी पुरवलेल्या 'बेनिफिशियल ओनर्स'च्या (लाभार्थी मालकांच्या) यादीत समाविष्ट आहेत. मतदानाचे अधिकार हे 'कट-ऑफ तारखे'ला त्यांच्याकडे असलेल्या शेअर्सच्या 'पेड-अप व्हॅल्यू'च्या (भरणा केलेल्या मूल्याच्या) प्रमाणात निश्चित केले जातील.

रिमोट ई-व्होटिंगचा कालावधी **बुधवार, ५ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९.०० वाजता (भाप्रवे)** सुरु होईल आणि **गुरुवार, ३ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजता (भाप्रवे)** समाप्त होईल.

गुरुवार, ३ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजल्यानंतर (भाप्रवे) इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे मतदान करण्यास परवानगी दिली जाणार नाही. कृपया नोंद घ्यावी की, वर नमूद केलेल्या तारखेनंतर प्राप्त झालेली मते अवैध मानली जातील.

छाननीकर्ता

कंपनीने 'मेसर्स अल्विन डिसूझा अँड कंपनी' चे प्रॅक्टिसिंग कंपनी सेक्रेटरी श्री. अल्विन डिसूझा (सदस्यत्व क्रमांक FCS ५५१९) यांची, किंवा त्यांच्या अनुपस्थितीत श्री. विजय सोनोने (सदस्यत्व क्रमांक FCS ७३०१) यांची, पोस्टल बॅलट आणि ई-मतदान प्रक्रिया निष्पक्ष व पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी 'छाननीकर्ता' म्हणून नियुक्ती केली आहे.

'स्क्रूटिनायझर' (तपासनीस) हे 'पोस्टल बॅलट्स'ची (रिमोट ई-व्होटिंग प्रक्रियेद्वारे) छाननी पूर्ण झाल्यानंतर आपला अहवाल बोर्डाचे अध्यक्ष / मुख्य कार्यकारी अधिकारी आणि व्यवस्थापकीय संचालक / मुख्य वित्त अधिकारी / कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी यांच्याकडे सादर करतील. 'पोस्टल बॅलट'चा निकाल रिमोट ई-व्होटिंग कालावधी संपल्यानंतर दोन कामकाजाच्या दिवसांत, म्हणजेच सोमवार, ७ सप्टेंबर २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी जाहीर केला जाईल. हा निकाल एनएसई आणि बीएसई यांना सूचित करून तसेच कंपनीच्या www.ltts.com या संकेतस्थळावर आणि एनएसडीएलच्या https://www.evoting.nsdl.com या संकेतस्थळावर प्रसिद्ध केला जाईल; तसेच तो कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयातील सूचना फलकावरही प्रदर्शित केला जाईल.

संपर्क तपशील

'रिमोट ई-व्होटिंग'बाबत (दूरस्थ ई-मतदानाबाबत) काही शंका असल्यास, सदस्य एनएसडीएल च्या www.evoting.nsdl.com या संकेतस्थळावरील 'डाउनलोड' विभागात उपलब्ध असलेली 'वारंवार विचारले जाणारे प्रश्न' आणि 'ई-व्होटिंग वापरकर्ता पुस्तिका' पाहू शकतात. तसेच, ते सुश्री प्राजक्ता पोवले / वीणा सुवर्णा, नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड, तिसरा मजला, नमन चेंबर, प्लॉट सी-३२, जी-ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र - ४०००५१ यांच्याकडे विनंती पाठवू शकतात किंवा evoting@nsdl.com वर ईमेल करू शकतात अथवा ०२२ ४८८६ ७००० या क्रमांकावर संपर्क साधू शकतात.

एल अँड टी टेक्नॉलॉजी सर्व्हिसेस लिमिटेडकरिता
संचालक मंडळाच्या आदेशानुसार
प्रसाद शानभाग
कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी
(मेंबरशिप नं. ए३०२५४)

स्थळ: मुंबई
दिनांक: ४ ऑगस्ट, २०२६